# ३. निवारा आपला आपला

### सांगा पाहू





- मांजर कशासाठी दबा धरून बसले आहे ?
- कावळे का घाबरले आहेत ? ते मांजराला का हुसकावत आहेत ?

### सांगा पाहू

- पक्षी घरटी बनवण्यासाठी कशाचा उपयोग करतात ?
- बिळात कोणकोणते प्राणी राहतात ?
- पाळलेल्या कोंबड्या कुठे राहतात ? त्यांची राहण्याची सोय कोण करते ?

## ● घराची गरज कशासाठी ?



कडाक्याची थंडी, सोसाट्याचा वारा, रणरणते ऊन, मुसळधार पाऊस यांचा आपल्याला त्रास होतो. त्यांच्यापासून बचाव होण्यासाठी आपण घरात राहतो.घरामुळे चोरीची भीती कमी होते.

काही लोक जंगलाच्या अगदी जवळ राहतात. त्यांना जंगली जनावरांचीही भीती असते. घरामुळे तीही कमी होते.

आपल्याप्रमाणे प्राण्यांनाही घराची गरज असेल का?

काही प्राण्यांना घराची गरज असते. ते प्राणी स्वत:साठी निवारा तयार करतात; तर काही प्राणी परिसरातल्या सुरक्षित जागी निवारा शोधतात.

● **नवा शब्द शिका !**

निवारा – संकटापासून बचाव करता येईल अशी सुरक्षित जागा. ऊन, वारा, पाऊस यांच्यापासून रक्षण होईल असा आसरा.

## ● स्वत:साठी निवारा बनवणारे प्राणी




पक्ष्यांची घरटी तुम्ही पाहिली असतील. घरटी हा पक्ष्यांनी स्वत:साठी तयार केलेला निवाराच असतो.

अंडी खाणाऱ्या अनेक प्राण्यांची पक्ष्यांना भीती वाटत असते. त्यामुळे पक्ष्यांना अंडी घालण्यासाठी सुरक्षित जागा हवी असते.



अंड्यांमधून पिल्ले बाहेर येतात. पिल्ले खाणारे प्राणीही असतात. स्वत:चे रक्षण करण्याइतकी ताकद पिल्लांमध्ये नसते. घरट्यांमुळे पिल्लांचेही रक्षण होते. म्हणून पक्षी घरटी बांधतात. घरटे बांधण्यासाठी पक्षी गवत, काड्या यांचा उपयोग करतात. कापूस, दोरीचे किंवा सुतळीचे तुकडेही वापरतात. त्यामुळे घरटे आतून मऊ आणि उबदार बनते.

सगळ्या पक्ष्यांची घरटी एकसारखी नसतात.




घरट्यासाठी पक्षी जागाही सोईची निवडतात. सुगरण पक्षी पहा ना! घरट्यासाठी पाण्याजवळची काटेरी झाडे पसंत करतात. झाडांच्या काही फांद्या पाण्यावर झुकलेल्या असतात. त्यांतल्या उंचावरील फांदीवर सुगरणीचे घरटे असते.

अंडी खाणाऱ्या प्राण्यांना तेथे जाणे अवघड असते.

शिंपी नावाचा पक्षी चिमणीपेक्षा लहान असतो. तो घरट्यासाठी किंचित मोठी पाने असलेल्या झुडपाची निवड करतो. जवळजवळ असणारी झुडपाची पाने शिवून तो घरटे बनवतो. शिवण्यासाठी दोऱ्याच्या जागी एखादी बारीक वेल तो वापरतो. ते चिमुकले घरटे त्या छोट्या पक्ष्याला पुरेसे असते.







काही कीटकसुद्धा त्यांचे निवारे स्वत: बनवतात. मधमाश्या झाडांवर किंवा डोंगरांच्या उंच कपारींच्या छताखाली पोळी बनवतात.



घुशी आणि उंदीर शेतात जमिनीखाली राहतात. राहण्यासाठी ते जमीन पोखरून बिळे करतात.

घुशी व उंदीर माणसांच्या वस्तीतही राहतात. घरांमधेच भिंतीत किंवा जमिनीखाली बिळे करतात; पण ते बहुधा मातीने बांधलेल्या घरांत निवाऱ्यासाठी येतात. सिमेंटने बांधलेल्या घरांत सहसा येत नाहीत कारण सिमेंटचे बांधकाम त्यांना पोखरता येत नाही.

## ● परिसरात आयता निवारा शोधणारे प्राणी



काही प्राणी निवाऱ्यासाठी स्वत: काहीच खटपट करत नाहीत. ते परिसरातलीच सोईची जागा निवाऱ्यासाठी निवडतात. काही कबुतरे आणि पारवे जंगलात राहतात. काही उंच कड्यांच्या छोट्या छोट्या कपारींत राहतात, तर काही माणसांच्या वस्तीच्या जवळही राहतात व भिंतीतील खबदाडींमध्ये निवारा शोधतात.

वाघ, बिबटे, तरस डोंगरांच्या गुहेत राहतात.



काही प्रकारची वटवाघळे उंच झाडांवर राहतात, तर काही प्रकारची वटवाघळे डोंगरांच्या अंधाऱ्या गुहांमध्ये राहतात किंवा ती जुन्या पडक्या, ओसाड इमारतींमध्येही निवारा शोधतात.





**माहीत आहे का तुम्हांला ?**

- नाग वारुळात राहतो असे म्हणतात, पण ते खरे नाही. मुंग्या वारूळ बनवतात, नाग बनवत नाही. नाग बिळात राहतो.




## पाळीव प्राण्यांचा निवारा

काही लोक प्राणी पाळतात.
पाळलेल्या प्राण्यांसाठी ते निवारा तयार करतात.



कोंबड्यांच्या निवाऱ्याला खुराडे म्हणतात.



गाईंसाठी गोठा बांधतात.



घोड्यांच्या निवाऱ्याला तबेला म्हणतात.

---



### आपण काय शिकलो

- थंडी, वारा, ऊन, पाऊस यांपासून बचाव करण्यासाठी प्राण्यांना निवाऱ्याची गरज असते.
- काही प्राणी स्वत:चा निवारा स्वत:च तयार करतात.
- काही प्राणी परिसरात आयता निवारा शोधतात.
- काही प्राणी आपण पाळतो. पाळलेल्या प्राण्यांसाठी आपण निवारा तयार करतो.



### हे नेहमी लक्षात ठेवा

हौसेकरिता प्राणी पिंजऱ्यात ठेवणे योग्य आहे का ? प्राण्यांना नैसर्गिक परिसरात जगू द्यावे.



## स्वाध्याय

### (अ) काय करावे बरे ?

आजकाल अनेक शहरांमध्ये पक्ष्यांची संख्या कमी होत चाललेली दिसते, त्याचे कारण काय असेल ? ती पुन्हा वाढायला हवी.


**(आ) जरा डोके चालवा.**

(१) मुंग्या कोणत्या पदार्थांपासून वारूळ बनवत असतील ?

(२) 'विंचू दगडाखाली सापडतो' असे का म्हणत असतील ?

(३) काही कबुतरे आणि काही पारवे जंगल सोडून मनुष्यवस्तीच्या जवळ रहायला आले. काही उंदीरही मनुष्यवस्तीच्या जवळ रहायला आले. काय कारण असेल ?

(४) पुढील चित्रांतील प्राणी आणि त्यांचा निवारा यांच्या जोड्या लावा.



**(इ) गाळलेले शब्द भरा.**

(१) सगळ्या पक्ष्यांची घरटी ............... नसतात.

(२) ............... नावाचा पक्षी चिमणीपेक्षा लहान असतो.

(३) काही प्राणी निवाऱ्यासाठी स्वतः काहीच ............... करत नाहीत.

(४) वाघ, बिबटे, ............... डोंगराच्या गुहेत राहतात.

(५) घोड्याच्या निवाऱ्याला ............... म्हणतात.

**(ई) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) शिंपी पक्षी पाने शिवण्यासाठी काय वापरतो ?

(२) अंडी खाणाऱ्या प्राण्यांना सुगरणीच्या घरट्यात जाणे अवघड का असते ?

(३) पक्षी आपले घरटे आतून मऊ आणि उबदार कसे करतात ?

(४) सिमेंटने बांधलेल्या घरांत उंदीर आणि घुशी सहसा का येत नाहीत ?

(५) अंधाऱ्या गुहांमध्ये राहणारी वटवाघुळे आणखी कुठे निवारा शोधतात ?